MHWS08001745-2025

## निशाणी ५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये वाद मिळकतीवरील वादीचे ताबा व वहितीस प्रतिवादी व त्यांच्या मार्फत इतर कोणीही हरकत व अडथळा करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूम वादीच्या हक्कात प्रतिवादींविरुध्द मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**दाव्यासंबंधी मिळकतीचे वर्णन** :-

२. मौजे कोयाळी बु., ता. रिसोड जि. वाशिम येथील गट नं.२६४ ०.हे ८३ आर शेत जमीन ज्याच्या चतुःर्सिमा पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | – | दिपक शेवाळे यांची जमीन |
| पश्चिमेस | – | प्रतिवादी क्र.१ यांची जमीन |
| दक्षिण | – | दिपक जाधव यांची जमीन |
| उत्तर | – | हर्षल जाधव यांची जमीन |

सदर मिळकतीस यापुढे 'वाद मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

**वादीचे कथन थोडक्यात असे आहे की :-**

३. वाद मिळकत ही मयत दौलत त्र्यंबक शेवाळे यांची कायदेशीर मालकी व ताब्यातील होती. दि.२३/०८/२०१८ रोजी ते मयत झाले असून त्यांच्या पश्चात वारस हक्काने वाद मिळकत ही वादीचे कायदेशीर मालकी व ताब्यात आली. वाद मिळकतीचे वादी हे कायदेशीर मालक व ताबेदार असल्याने वादी हे स्वतः वाद मिळकतीची वहिती करतात.

वादी क्र.१ ते ३ यांनी वाद मिळकतीमध्ये हळदीचे पीक पेरलेले असून सद्या हळदीचे पीक शेतामध्ये उभे आहे. सदर वाद मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्क, अधिकार व संबंध नाही. असे असतांना वादी क्र.१ हे दि.२२/०९/२०२५ रोजी वाद मिळकतीमधील हळदीच्या पीकाला फवारणी करत असतांना प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे वाद मिळकतीमध्ये आले व वादीस धमकी दिली की, वाद मिळकतीमधून तू निघून जा अन्यथा तुला जीवाने मारुन टाकू. प्रतिवादी हे वादीच्या वाद मिळकतीवर बेकायदेशीर ताबा घेण्याच्या उद्देशाने वादीसोबत नेहमी वाद घालतात. त्यामुळे वादीच्या मनात भिती निर्माण झाली आहे. वादी त्याबाबत पोलीस स्टेशनला गेले असता पोलीसांनी सदर वाद हा दिवाणी स्वरुपाचा असल्याने दिवाणी दावा दाखल करण्याबाबत कळविले. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** प्रतिवादी यांनी नि.क्र.१० वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. सदर प्रतिवादींतर्फे कथन असे की, प्रतिवादी क्र.१ यांच्याकडे मौजे कोयाळी येथे गट नं.२६३ मध्ये १ हे. १९ आर जमीन असून सदर जमीन त्यांचे मालकी व ताब्यात आहे. सदर जमिनीमध्ये ते पीके घेतात. गट नं.२६३ च्या पुर्वेस गट नं.२६४ म्हणजे वादींची जमीन आहे. वादी क्र.१ ते ३ हे सतत गट नं.२६३ च्या जमिनीच्या पुर्व बाजुने धूऱ्याकडील बाजुने कोरकार करुन धुरा फोडून प्रतिवादींचे शेतावर अतिक्रमण करण्याचे प्रयत्न करत होते. त्याबाबत प्रतिवादींनी वादींना समजून सांगितले मात्र कोणताही फरक पडला नाही. त्यामुळे प्रतिवादींनी गट नं.२६३ च्या मोजणीकरिता अर्ज केला. त्यानुसार दि.२७/०६/२०२२ रोजी गट नं.२६३ ची मोजणी झाली. सदर मोजणीमध्ये गट नं.२६३ चे क्षेत्र गट नं.२६४ चे वहिवाटीस आढळले. मोजणीदाराने दिलेल्या खुणाप्रमाणे त्यावेळी प्रतिवादींनी आपले क्षेत्र ताब्यात घेतले, तेव्हापासून सदर वादी हे प्रतिवादी व त्यांच्या कुटुंबीयांवर राग धरुन आहेत. त्यानंतर वादी क्र.१ ने गट

नं.२६४ ची दि.२५/१०/२०२४ रोजी मोजणी करुन घेतली. त्यानुसार मोजणीदाराने खुणा दिल्या त्यानुसार पुर्वीच्या २०२२ च्या मोजणीअन्वये ज्या खुणा दिल्या त्यापैकी गट नं.२६३ च्या खुणापैकी एक खुण बरोबर आली व दुसरी खुण जी दिली त्यामध्ये फरक आल्याने सदर खुणा मान्य नसल्याचे प्रतिवादींनी मोजणीदारास सांगितले. त्या मोजणीमध्ये देखील गट नं.२६३ चे काही क्षेत्र गट नं.२६४ मध्ये आढळले.

**५.** प्रतिवादींचे पुढे कथन की दि.२५/१०/२०२४ च्या मोजणीच्या खुणा प्रतिवादी क्र.१ ला मान्य नसल्याने प्रतिवादी क्र.१ ने संबंधीत विभागात दिलेल्या तक्रारीवरुन भूमी अभिलेख कार्यालय, रिसोड यांनी चौकशी अधिकारी म्हणून श्री. गरकळ यांची नियुक्ती केली. त्यानुसार गरकळ हे दि.२८/०८/२०२५ रोजी मोजणीकामी आले असता वादी क्र.१ ने गट नं.२६४ ची सरकारी मोजणी करण्याकामी रोव्हर मशीन पॉईंट घेण्यास मोजणी अधिकाऱ्यास मनाई केली व धमकी दिली, त्यामुळे मोजणीचे काम होउ शकले नाही. त्यानंतर मोजणी अधिकारी यांनी परत मोजणी करायची असल्यास पोलीस संरक्षण घेण्यात यावे अशी शिफारस केली. त्यानंतर प्रतिवादींतर्फे पोलीस संरक्षण मिळण्याकरिता अर्ज करण्यात आला त्यानुसार शिरपूर पोलीस यांनी दि.२४/०९/२०२५ रोजी जबाबाकरिता बोलविण्यात आले. प्रतिवादींतर्फे मोजणीकामी पोलीस संरक्षण मागितल्याची बाब वादींना समजल्यानंतर प्रत्यक्षात कोणतीही घटना घडली नसतांना केवळ दावा दाखल करण्याचे कारण दाखविण्याकरिता वादींनी दाव्यात खोटे कारण नमूद केले आहे. प्रत्यक्षात दि.२२/०९/२०२५ रोजी प्रतिवादी हे कोयाळी गावी नव्हते. वादी यांनी खोटया कथनाच्या आधारे अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**६.** अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे स्वरूप पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्याचा निष्कर्ष मी कारणमीमांसेसहित नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | वादी हे शाबीत करतात की, सकृतदर्शनी केस ही त्यांच्या बाजूने आहे ? | **<u>होय</u>** |
| २ | वादी हे शाबीत करतात की, तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर केल्यास त्यांचे नुकसान होणार आहे ? | **<u>होय</u>** |
| ३ | वादी हे शाबीत करतात की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | **<u>होय</u>** |
| ४ | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>- कारणमिमांसा -</u>

**७.** वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादी यांनी नि.क्र.१५ व प्रतिवादी यांनी नि.क्र.१७ वर लेखी युक्तीवाद दाखल केला. वादी तर्फे नि.क्र.४,११ वर कागदपत्रे दाखल केली आहेत. याउलट प्रतिवादी यांनी नि.क्र.१३ व १८ वर कागदपत्रे दाखल केली आहेत. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ करिता -</u>**

**८.** वरील मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने ते चर्चेकरिता एकत्रित घेण्यात आलेले आहेत. मा. मुंबई उच्च न्यायालयाने **<u>शामराव गणपत चिंतामणी विरुध्द काकासाहेब लक्ष्मण गोरडे २००८, (२) ऑल.एम.आर. ११८</u>** यातील न्यायनिवाडयात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त ताकीद मंजूर करण्यासाठी सकृतदर्शनी स्थीती, सोईचे समतोलत्व व एखादयाचे न भरुन येणारे नुकसान या गोष्टी लक्षात घेणे गरजेचे असल्याबाबत मत व्यक्त केलेले आहे.

**९.** हे प्रस्तापीत आहे की, जमिनी संदर्भात करण्यांत आलेले फेरफार किंवा जमिनीचे ७/१२ पत्रकी करण्यांत आलेल्या नोंदी हया महसुल गोळा करण्याच्या हेतुने करण्यांत आलेल्या असतात. सदरच्या नोंदी ज्या मिळकती संदर्भात व ज्या व्यक्तीच्या लाभात करण्यांत आलेल्या असतात त्या व्यक्तीस त्या नोंदीमुळे सदर मिळकती संदर्भात कसलाही कायदेशीर अधिकार, मालकी किंवा हक्क मिळू शकत नाही. अगर असा कायदेशीर अधिकार, मालकी किंवा हक्क दर्शविण्यासाठी त्या नोंदीचा उपयोगी होवू शकत नाहीत. तथापि, महसुल अभिलेखात केलेल्या या नोंदी खऱ्या आहेत असे त्या नोंदी बाबत गृहीतक आहे. परंतु अशा नोंदी हया फक्त पुरावा म्हणून उपयोगात आणल्या जावू शकतात. तथापि त्या अंतीम असू शकत नाहीत.

**१०.** वरील कायदेशीर बाबी उभय पक्षांचे वरील परस्पर विरोधी कथने, त्यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा व वादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद याचे मी काळजीपुर्वक अवलोकन केले. वादीच्या कथनाप्रमाणे वाद मिळकत ही वादी क्र.१ ते ४ चे वडिलांच्या मृत्युनंतर वादींच्या नावावर आलेली आहे. त्याप्रमाणे वाद मिळकतीवर वादींची मालकी व वहिवाट असून वादी यांनी वाद मिळकतीमध्ये हळदीच्या पीकाची लागवड केली आहे. दाखल कागदपत्रे गट नं.२६४ चे ७/१२ च्या उताऱ्याचे अवलोकन केले असता, वाद मिळकतीच्या मालकी व वहिवाट सदरी वादींच्या नावाची नोंद नमूद आहे. सदरची नोंद ही फेरफार क्र.७१७ प्रमाणे घेण्यात आलेली आहे. फेरफार क्र.७१७ चे अवलोकन केले असता, दौलत त्र्यंबक शेवाळे हे दि.२३/०८/२०१८ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणून वादींच्या नावाची नोंद ७/१२ पत्रकी नमूद झालेली आहे. एकूणच वादी हे वाद मिळकतीचे मालक व वहिवाटदार असल्याचे दिसून येतात. सदर वाद मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही हक्क व अधिकार असल्याचे दिसून येत नाही.

**११.** प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ यांनी गट नं.१६३ मध्ये १ हे १९

आर जमीन आहे. दाखल गट क्र.२६३ च्या ७/१२ उताऱ्यावरुन वादी सदर मिळकतीचे मालक व वहिवाटदार असल्याचे दिसून येतात. प्रतिवादीचे पुढे कथन की, दि.२७/०६/२०२२ रोजीचे मोजणीनुसार गट नं.२६३ चे काही क्षेत्र गट नं.२६४ चे वहिवाटीस आढळले व सदर क्षेत्र प्रतिवादीने ताब्यात घेतलेले आहे. तसेच वादीने दि.२५/१०/२०२४ रोजी केलेल्या मोजणीनुसार गट नं.२६३ च्या खुणापैकी एक खुण मान्य नसल्याने प्रतिवादी क्र.१ ने दिलेल्या तक्रारीनुसार श्री. गरकळ हे चौकशी अधिकारी म्हणून दि.२८/०८/२०२५ रोजी मोजणीकामी आले असता वादींनी मोजणीस हरकत घेवून मोजणीचे काम होवू दिले नाही. दाखल कागदपत्रावरुन विशेषतः प्रतिवादी क्र.१ यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन श्री. गरकळ, निमतानदार –१ यांची गट नं.२६३ व २६४ ची चौकशी करण्याकामी नियुक्ती झाल्याचे दिसून येते. त्यानुसार श्री. गरकळ हे मोजणी करण्याकामी दि.२८/०८/२०२५ रोजी गट नं.२६३ व २६४ मध्ये गेल्याचे दिसून येते. दि.२८/०८/२०२५ रोजीच्या पंचनाम्याचे अवलोकन केले असता वादी क्र.१ यांनी माझे शेतात पॉईंट घ्यायचे नाही व चौकशीचे काम करायचे नाही, असे सांगितल्याने मोजणी करता आली नाही असे दिसून येते. तसेच सदर पंचनाम्यावरुन पुन्हा मोजणी करायची झाल्यास पोलीस संरक्षण घेण्याबाबत कळविलेले आहे. दि.१५/०९/२०२५ रोजीच्या तहसिलदार रिसोड यांच्या पत्रावरुन गट नं.२६३ व २६४ च्या मोजणीच्या हद्दीखुणा कायम करण्याकरिता पोलीस बंदोबस्त पुरविण्याबाबत आदेश झाल्याचे दिसून येते. एकूणच वादी व प्रतिवादी यांचे गट नं.२६३ व २६४ बाबत मोजणी हद्द कायम करण्याबाबत वाद असल्याचे दिसून येते व सदर हद्दीखुणा करण्याबाबत प्रकरण उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे प्रलंबीत असल्याचे देखील दिसून येते.

**१२.** जरी अभिलेखावरुन प्रस्तुत प्रकरणी गट नं.२६३ व २६४ बाबत हद्द कायम करण्याबाबत चौकशी प्रलंबीत असली तरी वाद मिळकत ही प्रथमदर्शनी वादींचे मालकी व ताब्यात असल्याचे दिसून येते. सदर वाद मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही संबंध

असल्याचे दिसून येत नाही. जरी हद्दी खुणा निश्चितीनंतर व मोजणी चौकशीअंती एका गटातील क्षेत्र दुसऱ्या गटात आढळून आल्यास त्याबाबत योग्य तो कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन सदर क्षेत्र वादी किंवा प्रतिवादी ताब्यात घेवू शकतात. मात्र सद्यस्थितीत वादीने शपथेवर प्रतिवादींनी दि.२२/०९/२०२५ रोजी वाद मिळकतीमधून वादीस निघून जा अशी धमकी देवून बेकायदेशीर वाद मिळकतीचा ताबा घेण्याची धमकी दिल्याचे कथन केलेले आहे. जर प्रतिवादींनी वाद मिळकतीचा बेकायदेशीरपणे ताबा घेतल्यास अथवा वाद मिळकतीचे वहिवाटीस बेकायदेशीर हरकत अडथळा केल्यास वादींचे मोठया प्रमाणात नुकासान होणार आहे. एकूणच वाद मिळकत ही वादींच्या कायदेशीर ताब्यात असल्याने प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने केस असल्याचे स्पष्ट होते. तसेच सोयीचे संतुलन देखील वादींच्या बाजूने आहे. जर प्रस्तुतचा वादींचा तात्पुरता मनाई हुकूम अर्ज मंजूर केला तर त्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर केला तर वाद मिळकतीस प्रतिवादींकडून हरकत अडथळा होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादींनी वादीचे वाद मिळकतीस हरकत व अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम देणे उचीत होईल. त्यामुळे अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे.

**१३.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर केल्यास सरकारी मोजणी व चौकशी करता येणार नाही. त्यामुळे वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणार नाही. मात्र प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्याने केवळ प्रतिवादींस वाद मिळकतीस बेकायदेशीर हरकत अडथळा करु नये याबाबत तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येणार आहे. सदर आदेशाने उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून होणाऱ्या मोजणी अथवा चौकशीकामी कोणताही परिणाम होणार नाही व ते त्यांची नियमानुसार चौकशी/मोजणी करण्यास मुक्त राहतील.

**१४.** नि.क्र.५ चे सदरच्या अर्जावर आदेश पारीत करतांना करण्यात आलेली कारणमिमांसा व काढण्यात आलेला निष्कर्ष हा फक्त या अर्जाकरिता मर्यादीत असून वादी

व प्रतिवादी यांनी सदर दाव्याच्या गुणदोषावरील सुनावणीच्या वेळी सदर कारणमिमांसा किंवा निष्कर्षाने कोणत्याही प्रकारे बाधीत होण्याचे कारण नाही व ते दाव्यातील त्यांच्या कथनानुसार स्वतंत्रपणे पुरावा देणेस मुक्त राहतील. सबब मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.४ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:

## आदेश

१. वादीचा अर्ज (नि.०५) मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादींनी स्वतः, त्याचे नोकर चाकर, मित्रमंडळी, नातेवाईक अथवा त्यांच्या मार्फत कोणीही इसमानी वाद मिळकतीतील वादीचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा अंतिम निकालापावेतो देण्यात येत आहे.

३. सदर आदेशामुळे उपअधिक्षक भूमी अभिलेख, रिसोड यांनी बाधीत होण्याचे कोणतेही कारण नाही ते त्यांचे मोजणीचे/चौकशीचे काम करण्यास मुक्त राहतील.

४. अर्जाचा खर्च अंतिम दाव्याच्या निकालावेळी विचारात घेण्यात येईल.

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.02.05 17:12:22 +0530

(**दिनेश मु. गायकवाड**)

दि.०४/०२/२०२६

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Order**.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade-III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 04.02.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 04.02.2026 |
| Order uploaded on | : | 05.02.2026 |